# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ऊस व भात या पिकांची लागवड करण्यास बंदी घालण्याबाबत

**(१) ४२६३२ (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जमिनीतील पाण्याची पातळी प्रचंड प्रमाणात खाली गेलेल्या व पाण्यात मर्यादेपेक्षा अधिक फ्लुराईड क्षार असलेल्या महाराष्ट्रातील भागात ऊस व भात या पिकांची लागवड करण्यास बंदी घालण्यासाठी राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी महत्वपुर्ण सुचना हरित लवादाने राज्य सरकारला केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत राज्यशासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-०५-२०१८) :** (१) होय.

(२) हरित लवादाच्या निर्णयानुसार भुजल सर्वेक्षण यंत्रणेने राज्यातील १६ जिल्हयामध्ये पाणी परीक्षण केले आहे. सदर सर्वेक्षणामध्ये पाण्यातील फ्लोराईडचे प्रमाण हे पीक पध्दतीशी संबंधित नसून भौगिलक स्त्रोत आहे.

तथापि, ऊस पिकाला मोठया प्रमाणावर पाणी लागत असल्याने ऊस पीकाखालील क्षेत्र विहीत कालावधीत सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या दृष्टीकोनातून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबविण्यता येणाऱ्या नियमित केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजने व्यतिरिक्त ऊस उत्पादन शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना राज्य शासनाने आखलेली आहे. सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांना २% दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वृदांवन टाकळी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप करण्याबाबत**

**(२) ४९६०५ (२०-०४-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वृदांवन टाकळी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील धरणग्रस्त १२ शेतकऱ्यांना १२० एकर जमीनीचे वाटप करण्यात आले असून या जमीनीमध्ये परीश्रम करून जमीन लावगडी खाली आणली असताना गेल्या ३० वर्षापासुन जमीन "ह" वर्गामध्ये असल्यामुळे त्यांना जमीन मालकीचा हक्क न मिळाल्यामुळे त्यांना शासनाच्या विविध मिळणाऱ्या योजनापासुन वंचीत राहावे लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्त शेतकऱ्याना वाटप करण्यात आलेल्या "ह" वर्ग जमीनीचे मालकी हक्काचे भुमी स्वामी पट्टे अदयाप पर्यत देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मालकी हक्काचे भूमी स्वामी पट्टे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१८) :** (१) मौजा वृदांवन टाकळी येथील १२ शेतकऱ्यांना १२० एकर जमीनीचे वाटप करण्यात आले होते ही बाब महसूल दस्तवेजावरुन दिसून येत नाही. परंतु सदर जमीन वहिती करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर क्षेत्रावर मालकी हक्काबाबत रेकॉर्ड नुसार पटटयाबाबत कोणताही पुरावा नाही. मात्र सदर क्षेत्रावर संबंधितांची वहिती दिसून आली

(४) सदर जमीन कोणत्या अधिकाराने वहीत करीत आहे याबाबत कोणताही पुरावा महसूली रेकॉर्डवर आढळून आलेला नाही. त्यामुळे जमीनीच्या मालकी हक्काचे भूस्वामी पटटे करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील जिल्हयासाठी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(३) ६९३१५ (२७-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा प्रकल्पासाठी जमीन संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी एक हेक्टरच्या आतील किंवा एक हेक्टर पेक्षा जास्त पण

लागवडी योग्य नसलेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देता येते, या जाचक तरतुदीमुळे बहुसंख्य शेतकरी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रापासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील जिल्ह्यासाठी वरील जाचक तरतूद शिथील करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पाच्या सांडवा किंवा पुच्छ कालव्यासाठी संपादित करण्यात आलेल्या आहेत त्यांना पूर्वी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येत नव्हते. शासन निर्णय महसूल व वन विभाग, संकीर्ण -२००३/६५७/प्र.क्र.३५०/र-१, दि.२३.८.२००४ अन्वये प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

---

## कोल्हापूर विभागाच्या विभागप्रमुखांना निलंबित करुन विभागाची चौकशी करणेबाबत

**(४) ८६३४५ (१४-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे कोल्हापूर विभागाचे विभागप्रमुख यांना निलंबित करुन कोल्हापूर रा.प. कोल्हापूर विभागाची लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयामार्फत चौकशी करणेबाबत पतित पावन संघटना, कोल्हापूर यांनी दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) होय.
पतित पावन संघटना यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दि.२५.०४.२०१७ रोजी निवेदन दिलेले आहे. सदर निवेदन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दि.०६.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये राज्य परिवहन महामंडळाच्या कोल्हापूर विभागास प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) सदरबाबत चौकशी केली असता, निवेदनामध्ये केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचे आढळून आले, त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) तालुक्यात पीकविमा योजनेत सुलभता आणण्याबाबत**

**(५) ९९३७५ (२७-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात संभाव्य पीक नुकसानीत मदत देण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या पीकविमा योजनेची वेबसाईट निकामी ठरल्याने शेतक-यांची गैरसोय होत असून तहसिल, सेतूकेंद्र व तलाठयाकडे वारंवार जावे लागत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका ७/१२ वरील पेरणी केलेल्या पिकासाठी एकत्रित रक्कमेचा विमा भरण्याचा नियम असून सुध्दा वेगवेगळया पिकांसाठी वेगवेगळा अर्ज भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शेतक-यांचा वेळ व पैसा खर्ची पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने पीकविमा योजनेत सुलभता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सूचनानुसार खरीप हंगाम २०१७ पासून पिक विमा योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या पिक विमा पोर्टलच्या माध्यमातून सहभाग घेणे बंधनकारक करण्यात आले. बँकामध्ये होणारी गर्दी टाळण्यासाठी शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव स्विकारण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्राना प्राधिकृत करण्यात आले होते. बँका तसेच आपले सरकार सेवा केंद्रामार्फत शेतकऱ्याचे अर्ज स्विकारण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

पिक विमा पोर्टलच्या माध्यमातुन विमा प्रस्ताव स्विकारतांना शेतकऱ्याना ७/१२ उताऱ्यावरील ज्या पिकांसाठी विमा संरक्षण घ्यावयाचे आहे त्या सर्व पिकांसाठी एकच अर्ज भरणे व एकत्रित विमा हप्ता भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

(४) पिक विमा योजनेंतर्गत पिक विमा पोर्टलच्या माध्यमातून "बँका" तसेच "आपले सरकार" सेवा केंद्रामार्फत शेतकऱ्याचे अर्ज स्विकारले जातात. पिक विमा पोर्टलवर येणाऱ्या तांत्रीक अडचणी दूर करणे, तसेच, पोर्टलची क्षमता वाढविणेबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद विभागात डिजिटल नोंदणी करण्याबाबत**

**(६) १००५०८ (२९-१२-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात वाहन नोंदणी करताना पूर्वी कागदावर नोंदणी व्हावयाची पण सन २००७ पासून डिजिटल पद्धत आल्याने स्मार्ट कार्ड स्वरुपात नोंदणी मिळू लागली त्यामुळे सर्व मजकुर सुरक्षित व हाताळण्यास सोपा झाला व सर्व माहिती एका चीप वर येऊ लागली पण सदर पद्धत अचानक बंद पडून औरंगाबाद विभागात साध्या ए ४ कागदावर नोंद सुरू झाली त्यामुळे प्रमाणपत्र असुरक्षित व वापरायला कठिण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईसह इतर जिल्ह्यात स्मार्ट कार्ड व औरंगाबाद परिवहन विभागात मात्र साध्या कागदावर लाखो रुपये किंमतीच्या वाहनांची नोंद अशी विचित्र तफावत होत असल्याने वाहनधारक नाराज आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती औरंगाबाद विभागात देखील डिजिटल नोंदणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वाहन नोंदणीपत्र स्मार्ट कार्डवर जारी करण्याबाबतचा सेवापुरवठादारासोबतचा करार नोव्हेंबर, २०१४ मध्ये संपुष्टात आल्यामुळे नोंदणी प्रमाणपत्र स्मार्टकार्ड ऐवजी पूर्वमुद्रीत संगणकीय स्टेशनरीवर देण्यात येत होते. नवीन वाहन प्रणाली सुरु केल्यानंतर सदर नोंदणी प्रमाणपत्र ए-४ आकाराच्या कागदावर देण्यात येत असले तरी या नोंदणीप्रमाणपत्रामध्ये क्यु.आर.कोड ची सुरक्षा अंतर्भुत असल्याने ते सुरक्षित आहे.

आजमितीस औरंगाबाद येथे वाहन नोंदणी प्रमाणपत्र स्मार्ट कार्ड स्वरुपात जारी करण्यास सुरुवात झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे वाहन नोंदणी प्रमाणपत्र स्मार्ट कार्ड योजना दि.११.१२.२०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ येथे उपपरिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(७) १०४७५६ (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन कार्यालय जळगाव याचे विभाजन करुन भुसावळ येथे उपपरिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबत शासकीय स्तरावर बैठका होवून अहवाल मागविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ येथे उपप्रादेशिक कार्यालय सुरु करण्याबाबतचे निकष पूर्ण केले आहेत काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उपप्रादेशिक कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. तथापि परिवहन आयुक्त कार्यालयाने तशा आशयाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता.
(२), (३) व (४) नवीन प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालये निर्माण करण्याचे निकष विहीत करण्यासाठी शासनाच्या निदेशांप्रमाणे परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.११.२.२०१६ रोजीचे आदेशान्वये अपर परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. प्रस्तुत समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असून समितीच्या शिफारशींवर निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्ला (मुंबई) येथील शासकीय मातृ दुग्धशाळा बंद करुन खाजगी उपक्रमांतर्गत चालविण्याबाबत**

**(८) १०५४५० (०१-०४-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (मुंबई) येथील शासकीय मातृ दुग्धशाळा (मदर डेअरी) ही बंद करुन खाजगी उपक्रमांतर्गत चालविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, उक्त शासकीय डेअरीमध्ये कार्यरत असलेल्या विविध श्रेणीतील कर्मचा-यांना मुंबई बाहेरील शासकीय दुग्धशाळा व अन्य शासकीय विभागात त्यांना सामावून घेण्याची कार्यवाही सुरु असून त्यांच्या वर्गश्रेणी निहाय व शैक्षणिक पात्रतेनुसार सामावून घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुग्ध शाळेतील श्रेणी निहाय कर्मचा-यांवर होणा-या अन्यायामुळे कर्मचारी संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.दुग्धव्यवसाय राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती दुग्ध शाळेतील श्रेणी निहाय कर्मचा-यांवर होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) शासन निर्णय दि.३०/०८/२०१४ नुसार दुग्धव्यवसाय विकास विभागाचा सुधारित आकृतिबंध मंजूर झाला आहे. त्यानुसार अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांपैकी मजूर पदावरील कर्मचाऱ्यांना मुंबई बाहेरील नवी मुंबई व नाशिक विभागातील शासकीय दुग्धशाळेत सामावून घेणेबाबत शासन निर्णय दि.२४/१०/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना त्यांच्या पात्रता नुसार सामावून घेण्यात येत नसून, वेतनश्रेणीनुसार समतुल्य वेतनश्रेणीतील पदावर त्यांचे समायोजन करण्यात आलेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न भाग ३ मधील सविस्तर उत्तराचे अवलोकन करता दुग्ध शाळेतील श्रेणीनिहाय कर्मचाऱ्यांवर कोणताही अन्याय झालेला नाही, त्यामुळे पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्धवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे (जि.पुणे) प्रादेशिक परिवहन विभागात ई शुल्क प्रक्रिया बंद पडत असल्याने आरटीओ चे कामकाज होत नसल्याबाबत**

**(९) १०५८८६ (०१-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय,अंतर्गत ऑनलाईन ई शुल्क प्रक्रिया वारंवार बंद पडत असल्याने आरटीओ चे कामकाज पूर्णक्षमतेने होत नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय, पुणे अंतर्गत ऑफलाईन सुविधा उपलब्धच नसल्याने नेट कनेक्टीव्हिटी वारंवार बंद पडत असल्याने वाहतूकदारांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हजारो वाहनचालकांना लर्निंग लायसन्स व परमनंट लायसन्ससाठी देण्यात आलेल्या वेळा वाया जात असल्याने वाहनचालकांकडून संताप व्यक्त होत असून पुणे, आरटीओ संबंधित इंटरनेट सुविधा पुरविणाऱ्या कंत्राटदाराच्या पाठीशी असल्याचे खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी वाहनचालकांच्या सोयीच्या दृष्टीने तसेच शासनाचे आर्थिक नुकसान टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

परिवहन विभागाचा ऑनलाईन पध्दतीने जमा होणारा महसूल, स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या 'ई-पे गेटवे' द्वारा संकलीत करण्यात येतो. माहे डिसेंबर २०१७ मध्ये सदर ई-पे गेटवे सर्व्हर यंत्रणेमध्ये दुरुस्ती सुरु असल्यामुळे दि.१७.१२.२०१७ ते दि.२०.१२.२०१७ या कालावधीत नागरिकांना ऑनलाईन सेवेचा लाभ घेता आला नाही.

(२) हे खरे नाही

ऑनलाईन सुविधा बंद पडल्यास, वाहन कर व वाहनासंबंधी सर्व शुल्क ऑफलाईन पध्दतीने कार्यालयात स्विकारण्यात येते.

(३) व (४) वाहनचालकांना शिकाऊ अनुज्ञप्ती व कायम अनुज्ञप्ती करिता सारथी ४.० ही संगणक प्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. तांत्रिक कारणास्तव प्रणाली बंद असल्यास शिकाऊ अनुज्ञप्तीकरीता पूर्वनियोजित वेळ घेऊन आलेल्या नागरिकांना पुढील ७ दिवसांमध्ये त्यांच्या सोयीनुसार अर्ज सादर करण्याची सवलत देण्यात येते. तसेच, कायम अनुज्ञप्तीची चाचणी पूर्वनियोजित वेळेमध्येच घेण्यात येते. प्रणाली सुरु झाल्यानंतर याबाबतची कार्यालयीन कार्यवाही पार पाडण्यात येते. त्यामुळे प्रणाली बंद पडल्यास कायम अनुज्ञप्ती धारकांस देण्यात येणा-या सेवेवर प्रतिकुल परिणाम होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(१०) १०५९३५ (०१-०४-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ) सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे कार्यालय तातडीने सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मा.परिवहन मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनदेखील याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) नवीन प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालये निर्माण करण्याचे निकष विहीत करण्यासाठी शासनाच्या निदेशांप्रमाणे परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.११.२.२०१६ रोजीचे आदेशान्वये अपर परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. प्रस्तुत समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असून समितीच्या शिफारशींवर निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या हितासाठी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(११) १०६३१६ (०१-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या हिताच्या अनेक योजना सुरू केल्या असताना बहुतांशी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन महामंडळाच्या वाहनांमध्ये प्रथमोपचार बॉक्स रिकामा असणे, बहुतांशी बसमधील खिडक्या नादुरूस्त असणे, प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बस स्थानकातील पोलीस कक्ष बंद असणे, इंधन बचतीसाठी सिम्युलेटर प्रणाली विकसित करण्यात आली नसल्याने अनेक बसस्थानकात अस्वच्छता पसरली असून अशा अनेक गैरसोयीमुळे प्रवाशी खाजगी वाहनांचा मोठया प्रमाणात वापर करित असल्यामुळे एस.टी. महामंडळ तोटयात जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.टी. महामंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांच्या हिताच्या असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे महामंडळ तोटयात जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवाशांच्या हिताच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये प्रथमोपचार पेटया आवश्यक त्या औषधांच्या किटसह देण्यात आलेल्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बस स्थानकात पोलीस कक्ष कार्यान्वित आहेत. बसस्थानक स्वच्छतेबाबत दि.०१.१०.२०१७ पासून ३२ ठिकाणी व दि.०१.१२.२०१७ पासून उर्वरित बसस्थानके व बसगाडयांची स्वच्छता करण्यासाठी राज्यस्तरीय सेवापुरवठादार यांची निवड करण्यात आली असून, त्यांचेमार्फत सर्व बसस्थानकांची व बसगाडयांची स्वच्छता करुन घेण्यात येत आहे.

डिझेलचे दर, कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक बाबी यामुळे खर्चात वाढ झाली असल्यामुळे महामंडळाच्या तोटयात वाढ झालेली आहे. राज्य परिवहन महामंडळाकडून विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत वाढ झालेली आहे.

(४) राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी विनावाहक/शटल तसेच वातानुकुलीत शिवशाही बससेवा सुरु केल्या आहेत. प्रवाशांच्या सेवेसाठी ऑनलाईन आरक्षण सुविधा,
ई-तिकीट व मोबाईल ॲप्सद्वारे आरक्षण सुविधा, प्रवासी सूचना व तक्रारींची दखल घेण्यासाठी कॉलसेंटर सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे महामंडळाच्या उत्पन्नात व प्रवासी संख्येत वाढ झालेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) आगारातील अनियमित बसफे-या पूर्ववत होण्याबाबत**

**(१२) १०६९५३ (०१-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर आगाराच्या (जि.बुलढाणा) अनेक बस फे-यांचे नियोजन कोलमडले असून अनियमित बससेवेमुळे महेकर ते देऊळगावराजा मार्गे हिवरा आश्रम, लव्हाळा, साखरखेर्डा, शेदूंर्जन, मलकापूर पांग्रा ही बस फक्त रविवारी सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ही बस सेवा फक्त रविवारी सुरु ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, चौकशीअंती आगारातील अनियमित बसफे-यां पूर्ववत होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.
माहे जानेवारी, २०१८ मध्ये सदर फेरी फक्त रविवारीच न चालविता इतर दिवशीही चालविण्यात आलेली आहे. सदर मार्गावर हिवरा आश्रम, लव्हाळाकरिता मेहकर ते बुलढाणा दर २० मिनिटांच्या वारंवारीतेने शटल फेऱ्या सुरु असून, मेहकर येथून साखरखेर्डा करिता २० फेऱ्या उपलब्ध आहेत. तसेच, सकाळी साखरखेर्डा ते जालना ६.४५ वा. ची मार्गे शेदूर्जन, मलकापूर पांग्रा, दुसरबीड, सिंदखेडराजा फेरी उपलब्ध आहे व मेहकर येथून देऊळगावराजाकरिता मार्गे दुसरबीड, सिंदखेडराजा २९ फेऱ्या उपलब्ध आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एस.टी.महामंडळाच्या नव्या गणवेशावर एस.टी. कर्मचारी नाराज असल्याबाबत**

**(१३) १०७०३७ (०१-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जानेवारी २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान एस.टी.महामंडळाच्या मुख्यालयात, मुंबई सेंटर येथे एस.टी. महामंडळ कर्मचाऱ्यांचा गणवेश कार्यक्रम पार पाडण्यात आला असून नव्या गणवेशात काहीच बदल नसल्याने कर्मचारी वर्ग नाखुश असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्यातील कानाकोपऱ्यात फिरत असणाऱ्या एस.टी.बांधवांना देण्यात आलेल्या गणवेशाचा कपडा हा हलक्या दर्जाचा असणे, अयोग्य माप या कारणांमुळे कर्मचारी नाराज आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गणवेश तयार करत असताना एस.टी.कर्मचारी बांधवांच्या भावना अथवा सूचना विचारात न घेता गणवेश तयार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबणाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.

नॅशनल इन्सिटयुट ऑफ फॅशन टेक्नोलॉजी, मुंबई या केंद्र शासनाच्या संस्थेने निश्चित केलेल्या गणवेश पॅटर्न, प्रारुप व विनिर्देशांनुसार तयार केलेल्या नवीन गणवेशास सर्व कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी मान्यता दिली आहे.

(२) नाही.

गणवेशाचे कापड केंद्रीय कपास प्रौदयोगिकी अनुसंधान संस्थान (भारतीय कृषी अनुसंधान परिषद) या प्रयोगशाळेकडून तपासणी करण्यात आले आहे. राज्य परिवहन महामंडळातील पात्र कर्मचाऱ्यांना त्यांनी दिलेल्या मापानुसारच गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला (जि.अहमदनगर) तालुक्यातील राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

**(१४) १०७१२० (०१-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अहमदनगर) तालुक्यातील अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित या राष्ट्रीयकृत विकास योजनेच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याची मागणी मा.दुग्धविकास मंत्री यांचेकडे अकोले येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीअंती अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित या राष्ट्रीयकृत विकास योजनेच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०५-०६-२०१८) :** (१) अकोले येथील लोकप्रतिनिधींनी दि.२२/११/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे प्रश्नांधिन नमुद प्रकरणी मागणी केली आहे हे खरे आहे.

(२), (३) व (४) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत प्रकल्प मंजूर करतांना प्रामुख्याने जिल्हयातील एकुण स्थापित प्रक्रीया/शितकरण क्षमता आणि दूध संकलनाचा विचार केला जातो.

सन २०१५ मध्ये उक्त संघाचा प्रस्ताव राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत अनुदानाकरिता शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता, असे निर्दशनास आले की, सन २०१२ ते २०१५ या लागोपाठच्या ३ वर्षात संघास लेखापरिक्षण अहवालात "अ" वर्ग मिळालेला नाही. तसेच अहमदनगर जिल्यातील उपलब्ध असलेली शासन, सहकार व खाजगी क्षेत्रातील स्थापित प्रक्रीया व शितकरण क्षमता ही संकलित होणा-या दूधापेक्षा अधिक असल्याने सदर संघाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

असे असले तरी सदर संघास सन २०१४-२०१६ हया २ वर्षात एकत्रितरित्या जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत "बल्क मिल्क कुलर" व "संगणक सचिव" यासाठी रु.१.५० कोटी व केंद्र पुरस्कृत NDP-I या प्रकल्पा अंतर्गत "संस्था बळकटीकरण", "बल्क मिल्क कुलर" व "संगणक सचिव" खरेदी करण्यासाठी रु.१.४४ कोटी इतक्या रकमेचे अनुदान देण्यात आले आहे.

---

### राज्यात दुधाचे दर कमी झाल्याबाबत

**(१५) १०७१८८ (०१-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूधाच्या होणा-या कमी दराबाबत दूध उत्पादक शेतकरी व दुग्ध विकास मंत्री यांचे समवेत बैठक आयोजित करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठक केव्हापर्यंत निश्चित करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर बैठक तातडीने आयोजित करुन शेतकऱ्यांना दूध दराबाबत दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०५-०६-२०१८) :** (१) होय, दि.१९/०१/२०१८ रोजी बैठक झाली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) शासनाने दि.२१/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.३.०० इतकी दूध खरेदी दरात वाढ केली आहे. सदर दरवाढीनुसार रु.२७/- प्र.लि.याप्रमाणे शासन दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध खरेदी दर देत आहे. मात्र सहकार व खाजगी दुग्ध व्यवसायिक शासनाच्या दुध खरेदी दराप्रमाणे दूध खरेदी दर शेतक-यांना देत नसल्याने शेतक-यांचे आर्थिक शोषण होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर विसंगती दूर करण्यासाठी शुगर प्राईज कंट्रोल ॲक्टच्या धर्तीवर दुधाकरिता कायदा करण्याची प्रक्रीया शासनस्तरावर सुरु आहे.

---

## गडहिंग्लज, चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये बससेवा पूर्ववत सुरु करणेबाबत

**(१६) १०७२०१ (०५-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, चंदगड व आजरा तालुक्याना व गावांना जोडणाऱ्यांना बससेवा तसेच कोल्हापूर चंदगड या मार्गावरील बससेवा परिवहन महामंडळाने व लांब पल्ल्याच्या पुणे व मुंबई या मार्गावरील बससेवा बंद केल्याने उक्त तिन्हीही तालुक्यातील महाविद्यालयातील विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील व चंदगड-कोल्हापूर या मार्गावरील बससेवा सुरु करुन सर्वसामान्य जनता विद्यार्थी-विद्यार्थीनीची होणारी गैरसोय दूर करावी अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती गडहिंग्लज, चंदगड-कोल्हापूर या मार्गावरील बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्हयातील आजरा, गडहिंग्लज, चंदगड तालुक्यातील मुंबई व पुणे येथे वास्तव्यास असणाऱ्या प्रवाशांच्या सोईसाठी नमूद आगारांमधून सुमारे १२ बसेसद्वारे मुंबई, पुणे व तत्सम परिसरामध्ये बसफेऱ्या चालनात आणण्यात आल्या होत्या. तथापि, सदर भागातून खाजगी वाहतूकदारांकडून आकारण्यात येणाऱ्या अल्प भाडयामुळे या ठिकाणचा प्रवासी वर्ग खाजगी वाहतूकीकडे वळला परिणामी महामंडळाच्या फेऱ्यांना अत्यल्प उत्पन्न प्राप्त होऊ लागल्याने सदरच्या फेऱ्या बंद करण्यात आल्या.

तथापि, बंद फेऱ्या पुन्हा सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांचे निवेदन महामंडळास प्राप्त झालेले आहे. सद्यस्थितीत महामंडळामध्ये नव्याने दाखल झालेल्या शिवशाही बसेसद्वारे गडहिंग्लज आगारामार्फत गडहिंग्लज-निगडी व चंदगड-भाईंदर/बोरीवली/अर्नाळा या लांब पल्ल्याच्या फेऱ्या चालनात आणलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यात पशुवैदयकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत..**

**(१७) १०७२४५ (०१-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यात गेली दोन वर्षापासून ७ पेक्षा अधिक पशुवैदयकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुवैदयकीय अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे पशुपाल्यांना वारंवार अडचणींना तोंड दयावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुवैदयकीय अधिकाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांना दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पशुवैदयकीय अधिकाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

गडहिंग्लज (जि.कोल्हापूर )तालूक्यात श्रेणी-१ चे १२,श्रेणी- २ चे ४ व तालपसचि १ असे एकूण १७ पशुवैदयकीय दवाखाने आहेत.सदर दवाखान्यांकरीता एकूण १८ मंजूर पदे असून ८ भरलेली आहेत व १० पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकारी यांचेकडे सोपवून पशुपालकधारक शेतकरी यांच्या जनावरांना नियामित वैद्यकीय सोयी- सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही,

अशा प्रकारचे कुठलेही निवेदन प्राप्त झाले नाही.

(४) सन २०१८ च्या नियतकालिक बदल्यांच्या वेळी तसेच पशुधन विकास अधिकारी गट-ब पदोन्नतीच्या वेळी पदस्थापना करतांना पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळास तोटा होत असल्याबाबत**

**(१८) १०७३२९ (०१-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी वाहतुकीला प्रोत्साहन देणे तसेच काही बाबींचे खाजगीकरण करण्यात आल्याने एस.टी. महामंडळाला तोटा येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याशिवाय करापोटी शासनास महामंडळ काही कोटी देते तथापि शासन सबसीडी देत नाही, हे ही कारण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार एस.टी. महामंडळाला तोटा येवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळास तोटा होऊ नये व आर्थिक सुधारणा करण्यासाठी उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्यासाठी सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तीक करारासाठी देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटींमध्ये बदल उदा.दिवसांची गणना, खोळंबा आकार माफ, अतिकालीक भत्ता माफ इत्यादी. हिरकणी सेवेत पुश बॅक सीट सुविधा, नवीन वातानुकुलित शिवनेरी बस खरेदी भाडेतत्वावर, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवाशी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाडयात सवलत. मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देवून प्रवासी उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. ई-तिकीट व मोबाईल ॲप्सद्वारे आरक्षण सुविधा, स्मार्ट कार्ड सुविधा, राज्य परिवहन बसेसवर जीपीएस, व्हीटीएस, सीसीटीव्ही, वायफाय, पॅसेंजर इनफोरमेशन सिस्टीम तसेच सूचना तक्रारीची दखल घेणेबाबत सक्षम कॉलसेंटरची उभारणी केलेली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मोबाईल ॲप तयार करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याबाबत.**

**(१९) १०७६९६ (०१-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड**

**(धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये भविष्यकाळात प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी अप्पर परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर परिवहन आयुक्त यांच्या गटाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यात कोणत्या शिफारशी आहेत,

(४) असल्यास, शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) व (२) होय हे खरे आहे. अपर परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल परिवहन आयुक्त कार्यालयाने दि. २६ एप्रिल २०१८ रोजी शासनास सादर केला आहे.

(३) व (४) नवीन जिल्हा निर्मिती झाल्यास नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. त्या व्यतिरिक्त नवीन कार्यालयाची स्थापना करण्याची आवश्यकता नाही तसेच ज्या जिल्हयांची लांबी जास्त आहे अशा जिल्हयांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे अशा शिफारशी समितीने शासनास केल्या आहेत. समितीच्या शिफारशींवर निर्णय घेण्याची बाब विचाराधिन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगली जिल्हयात द्राक्षबागा, भाजीपाला इ. पिकावर झालेला रोगाचा प्रादुभाव

**(२०) १०७८४६ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयाच्या बहुतांश भागात ढगाळ वातावरणामुळे द्राक्षबागा, भाजीपाला इ. पिकावर विविध रोगाचा प्रादुभाव वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील भिसी येथे दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत

**(२१) १०७८७० (०१-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील भिसी येथे दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करणे प्रलंबित प्रकरणी पत्रव्यवहार स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्य विभाग मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाच्या पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विभागाने भिसी (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) या ग्रामीण भागातील प्रस्तावित दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करणे प्रलंबित प्रकरणी मान्यता देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी मान्यता देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रकरणास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.प्रस्तावित दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करणेबाबतचा संस्थेचा प्रस्ताव सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) चंदपूर या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संस्था नोंदणीबाबत शासन निर्णयातील तरतूदीनूसार तपासणी करून पुढील उचित कार्यवाही सहाय्यक निबंधका मार्फत करण्यात येईल.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सवलतीचा एस.टी. प्रवास पास बंद केल्याबाबत**

**(२२) १०८३८७ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता दिला जाणारा सवलतीचा एस. टी. प्रवास पास माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एस. टी. प्रवासाचा आर्थिक भुर्दंड बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सवलतीचे पास बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीअंती मोफत एस. टी. प्रवास सवलतीचे पास पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.

राज्य शासन संचलीत औदयागिक शिक्षण संस्था, तांत्रिक/संगणकीय व नवीन व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना व शासनमान्य संस्थेस शिक्षणासाठी शैक्षणिक सत्रानुसार सवलतीचे पासेस देण्यात येत आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हारुळ (जि.कोल्हापूर) मध्ये विना पाटील संस्थेमुळे**
**दुध उत्पादकाचे झालेले नुकसान**

**(२३) १०८९२६ (०१-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारुळ (जि.कोल्हापूर) मध्ये विना पाटील नावाची दूध संस्था असून इमारत नाही, दूध संकलन नाही, कर्मचारी नाहीत, बोर्ड नाही केवळ ठरावासाठी कागदोपत्री ही संस्था चालवित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेच्या नावाखाली गाईचे दूध सांगरुळमध्ये सुमारे ७५ लिटर संकलन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोकुळ संघाने गाय दुधाच्या लिटरमागे दोन रुपये दर कमी केल्यामुळे गाईच्या दूध उत्पादकांचे एकावेळी २२ हजाराचे नुकसान होत असून कोल्हापूर जिल्हयातील गाय दूध उत्पादकांचे दररोज १० लाखांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस दूध संस्था काढून अशा प्रकारे गाईचे दूध संकलन होत असतांना अतिरिक्त दूधाचे खापर शेतकऱ्यांवर फोडून दूध उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीअंती दूध उत्पादक शेतकऱ्यांवर होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. श्री.विश्वासराव ना.पाटील सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या.म्हारूळ ता.करवीर जि.कोल्हापूर, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० अंतर्गत नोंदणीकृत दुग्ध सहकारी संस्था आहे.संस्थेचे सद्यस्थितीत गाईच्या दुधाचे दैनंदिन संकलन ९० लिटर इतके आहे.संस्थेची स्वत:ची इमारत नाही.तथापि श्री.अशोक पांडुरंग पाटील यांच्या मालकीच्या जागेत संकलन होत आहे.संस्थेचे सचिव म्हणून श्री.शिवाजी हरी यादव हे कामकाज पाहत आहेत.संस्थेच्या नावाचा बोर्ड आतील बाजूस आहे.संस्था कोल्हापूर जिल्हा दूध उत्पा.संघ मर्या.कोल्हापूर या संघास दूध पुरवठा करत आहे.
(२) हे खरे नाही. संस्थेमार्फत ९० लिटर गाईच्या दूधाचे दैनंदिन दूध संकलन करण्यात येते.
(३) हे अंशत: खरे आहे.गोकूळ दूध संघाकडून गाय दूध खरेदी दर व संघामार्फत दूध संस्थांना देण्यात येणारा व्यवस्थापन खर्च,अंतिम दूध दर फरक,संघामार्फत देण्यात येणा-या विविध सेवा-सुविधा,अनुदान याचा विचार करता संघाने गाय दूध उत्पादकांचे नुकसान केलेले नाही.गाय दूध भुकटी व लोण्याचे दर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय बाजार पेठेत सर्वात कमी स्तरावर असल्याने गाय दूध खरेदीचे दर संघाने कमी केले आहेत.तसेच संघाने देखील गाय दूध लोणी व भुकटी मध्ये तोटा सहन केलेला आहे,असे संघाने दि.१२.०२.२०१८ रोजीच्या पत्राने कळविले आहे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) कोल्हापूर या कार्यालयाने दि.०६.११.२०१७ च्या पत्रान्वये कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्या.कोल्हापूर यांनी गाय दूध खरेदी दरात दोन रूपये कमी केले, बाबतचा अहवाल विभागीय उपनिबंधक,पुणे यांना सादर केलेला आहे.त्या अनुषंगाने विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी संघास दि.०६.११.२०१७ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ७९ (अ) (३) अन्वये नोटीस दिली आहे.
(४) हे खरे नाही,अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(७) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथील राज्यपरिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२४) १०९१५९ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील राज्यपरिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली असून मोडलेले दरवाजे, तुंबलेले पाणी अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे येथील कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न गंभीर असून कर्मचा-यांना बाहेरुन पाणी विकत आणावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील स्वच्छतागृहांचे दुरवस्था दूर करण्यासोबत पिण्याच्या पाण्याचे प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहामध्ये तुंबलेल्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. सदर तुंबलेल्या पाण्याचा निचरा करुन स्वच्छतागृह कार्यान्वित करण्यात आले आहे.

(२) नाही.

कार्यशाळेत महानगरपालिकेतर्फे सतत पाणी पुरवठा असून, पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक विभागात झालेल्या अपघातात जखमी / मृत व्यक्तींच्या नातेवाईकांच्या नुकसान भरपाईबाबत

**(२५) १०९५२३ (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागात गेल्या वर्षभर झालेल्या अपघातांमध्ये जखमींना तसेच मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईचा आकडा साडेचार कोटींच्यावर गेला असल्याचे दि.१० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाला मागील वर्षाच्या तुलनेत यंदा दुपटीने भरपाई द्यावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतक्या मोठया प्रमाणातील नुकसान भरपाई महामंडळाच्या आर्थिक परिस्थितीला आणखी बिघडवणारी असल्याने अपघात होणार नाहीत याची काळजी घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) व (२) नाही.

सन २०१६-१७ या कालावधीत राज्य परिवहन नाशिक विभागाकडून अपघातात जखमी/मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना रु.२,८७,९४,७५७/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ या कालावधीत अपघातात जखमी/मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना रु.४,५२,८७,१५१/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. परंतु सदरची रक्कम ही सन २०१७-१८ या कालावधीत झालेल्या अपघातातील जखमी/मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना देण्यात आलेली नसून सन २००७-२०१७ या कालावधीत अपघातातील जखमी/ मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना मोटार अपघात न्यायालयाच्या दाव्यांच्या निकालानुसार व राज्य परिवहन नियमानुसार “पी” फॉर्मद्वारे व आर्थिक तात्कालीक मदत अशी एकत्रित रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे अपघात टाळण्यासाठी महामंडळाकडून विविध उपाययोजना नियमित करण्यात येत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने चालक उजळणी प्रशिक्षण, ज्या चालकांकडून अपघात झालेला आहे अशा चालकाचे विशेष प्रशिक्षण, नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी, विनाअपघात सेवेबद्दल चालकांना प्रोत्साहनपर बक्षिसे, बिल्ले इ. देणे, सुरक्षितता मोहिम राबविणे, आगारांमध्ये बैठका घेवून चालकांचे प्रबोधन करणे इ.उपाययोजना अपघात टाळण्यासाठी नियमितपणे राबविण्यात येत असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि.रायगड) आगाराची झालेली दुरवस्था**

**(२६) १०९८२६ (०१-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) आगारात उपहारगृह बंद, मुतारीची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, घाणीचे साम्राज्य अशा समस्यांनी ग्रासल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या आगारातील समस्या सोडविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या उरण बसस्थानकावर पुरुष व महिलांकरिता प्रसाधनगृहांची व्यवस्था आहे. माहे सप्टेंबर, २०१७ पासून बसस्थानक तसेच, आगार स्वच्छतेकरीता ब्रीक्स इंडिया लि.संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उरण बसस्थानकावरील सर्व आस्थापना सुस्थितीत आहेत. मात्र आगारातील उपहारगृह बंद आहे. आगार व बसस्थानकाला ग्रामपंचायतीकडून पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील एस टी आगारातील नादुरुस्त गाडयांची दुरुस्तीसह मुलभूत सोयी-सुविधा पुरविणेबाबत

**(२७) १०९९४८ (०१-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील एस टी आगाराचा मोठया प्रमाणात गैरकारभार सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील वेळास आगार, आदगाव, सर्वे, नानवली अशा चार गावांसाठी मुंबईकडे जाणा-या व मुंबईहून परतणा-या प्रवाशांना एक ही गाडी नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस टी आगारातील नादुरुस्त गाडयांमुळे प्रवाशांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहेत परंतु आगारात मुलभूत सुविधाचा देखील अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) तदनुसार उपरोक्त एस टी आगारातील नादुरुस्त गाडयांची दुरुस्तीसह तसेच मुलभूत सोयी-सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) श्रीवर्धन तालुक्यातील वेळास आगार, दिवे आगार, आदगाव, सर्वे, नानवेल या चार गावांसाठी मुंबईकडे जाणाऱ्या व परतणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी श्रीवर्धन-नानवेल-मुंबई ०५.००/ २१.३० ही फेरी सध्या नियमितपणे सुरु आहे.

श्रीवर्धन-नानवेल-बोरीवली हया फेरीला अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने फक्त उन्हाळी गर्दीच्या हंगाम तसेच गणपती, होळी या हंगामात चालविण्यात येत होती. या वर्षी होळी हंगामात सुरु करण्यात आलेल्या श्रीवर्धन-नानवेल-बोरीवली फेरीस समाधानकारक भारमान असल्यामुळे सुरु ठेवण्यात आली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते खराब असल्यामुळे टायर पंक्चर व स्प्रिंग तुटणे या कारणास्तव काही वेळेस फेऱ्यास अनियमितता होते. वेळोवेळी दैनंदिन देखभाल करुन फेऱ्या अनियमित होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येते.
(५) श्रीवर्धन स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम सुरु असून, पुरुष व महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्यात येत आहेत. प्रवाशांना पिण्याची पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. आगार, स्थानक तसेच गाडयांची संपूर्ण स्वच्छता करण्यासाठी खाजगी कंपनीची नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्याद्वारे वेळोवेळी स्वच्छता करुन घेतली जाते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड खाडीपट्ट्यातील शेतक-यांचे वालाचे पिक धोक्यात आल्याबाबत**

**(२८) १०९९५५ (०४-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड खाडीपटटयात शेतक-यांनी केलेल्या वाल पिकावर नारुच्या वेलीने आक्रमण केल्याने वालाच्या शेतीचे पिक धोक्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शेत पिकांची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, खाडीपटटयात बहरलेल्या वालाच्या शेतीला आक्रमण केलेल्या नारुच्या वेलीवर मात करण्याकरिता शासन स्तरावर काय उपाययोजना आखण्यात आल्या आहेत वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३०-०५-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) अमरवेलीचा प्रादुर्भाव दरवर्षी अल्प प्रमाणात ठराविक क्षेत्रात ज्या ठिकाणी शेतकरी वालाची पेरणी केल्यानंतर पुढील उपाययोजनांबाबत दुर्लक्ष करतात अशा ठिकाणीच आढळून येतो. वालाच्या क्षेत्राच्या अतिशय अल्प प्रमाणात प्रादुर्भाव असल्याचे पाहणीत निदर्शनास आले आहे.
(३) अल्प प्रमाणात प्रादुर्भाव असल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर अमरवेलीच्या नियंत्रणासाठी तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत ग्रामस्तरावर मेळावे, चर्चासत्रे, प्रक्षेत्र भेटी यांचे माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. भौतिक व रासायनिक स्वरुपाच्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयात चिंचणेर वंदन येथे ट्रॅक उभारण्याबाबत**

**(२९) ११०४८८ (०१-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात नविन व जुन्या वाहनाच्या पासिंगच्या चाचणीसाठी आवश्यक असणारा ट्रॅक उपलब्ध नसल्याने सातारा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील वाहनाचे पासिंग दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हयातील ४० हजार ट्रान्सपोर्ट वाहनांच्या पासिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिंचणेर वंदन येथे ट्रॅक उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या जागेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती चिंचणेर वंदन येथे ट्रॅक उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे नाही. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सातारा येथील पासिंगचे काम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कराड येथे सुरु आहे. त्यासाठी सातारा कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक/सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांची नियुक्ती केली जाते.

(३) आणि (४) होय हे खरे आहे. ट्रॅक उभारणीसाठी चिंचणेर सं. लिंब येथील स. नं. १०९०/१७ मधील गायरान क्षेत्र ८.०१ हे. आर पैकी ४ हे. आर इतके क्षेत्र उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित ग्रामसभेने नकारात्मक ठराव दिला आहे. त्यामुळे प्रस्तुत गायरान क्षेत्राखेरीज पर्यायी क्षेत्राच्या उपलब्धतेची खातरजमा केली जात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे अनुदान मिळण्याबाबत**

**(३०) ११०४९० (०१-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये शासनाच्या वापर तेथे ठिबक पॉवर या घोषणेनुसार १४०० शेतकऱ्यांनी राबविलेल्या ठिबक सिंचन योजना ठिबक संच बसविण्यापूर्वी शेतकऱ्यांनी शासनाची पूर्व संमती घेतली नसल्याचे कारण देवून १४०० शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे सुमारे साडेतीन कोटी रुपयांचे अनुदान दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सन २०१२-१३ मध्ये शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली नसल्याचे कारण देवून १३०० शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१२-१३ व सन २०१६-१७ या दोन्हीवर्षी उक्त शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच योजनेचे अनुदान तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-०५-२०१८) :** (१) प्राप्त अर्जांना उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत प्राथम्यक्रमा नुसार पुर्वसंमती देण्यात येते. पुर्वसंमती प्राप्त अर्जदारानी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेले अर्जदार अनुदानासाठी पात्र ठरतात.

सन २०१६-१७ या वर्षात सातारा जिल्हयात उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत पात्र ५९८३ अर्जांपैकी ४६७७ अर्जांना पुर्वसंमती देण्यात आली. पुर्वसंमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या ४६६९ शेतक-यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(२) सन २०१२-१३ पासुन सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी शेतक-यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतात. सातारा जिल्हयात सन २०१२-१३ मध्ये ऑनलाईन प्राप्त ४८६८ शेतक-यांचे अर्ज पात्र ठरले. त्यापैकी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या ४८६६ शेतक-यांना अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे.
(३) सन २०१२-१३ मधील ऑनलाईन प्राप्त झालेल्या सर्व पात्र अर्जदार शेतक-यांना तसेच सन २०१६-१७ या वर्षातील पुर्व संमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या सर्व शेतक-यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१२-१३ व सन २०१६-१७ या वर्षातील अनुदानासाठी पात्र असलेल्या कोणत्याही शेतक-यांचे अनुदान प्रलंबित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इगतपूरी (जि.नाशिक) येथील विदयार्थ्यांसाठी एस.टी.बस सेवा सुरु करण्याबाबत

**(३१) ११०५२८ (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपूरी (जि.नाशिक) येथील टाके घाटी येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धन कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मोठया प्रमाणात विदयार्थी शिक्षण घेत असून त्यांना येण्या-जाण्यासाठी एस.टी.बस सोय नसल्यामुळे विदयार्थी यांनी इगतपूरी आगारप्रमुख यांचेकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अदयापी विदयार्थ्यांसाठी एस.टी.बस सेवा सुरु करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती कर्मवीर पुंजाबाबा महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठी एस.टी.बस सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे इगतपूरी ते घोटी या मार्गावर जाणाऱ्या ११७ व येणाऱ्या १२३ बसफेऱ्या चालनात आहेत. कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे इगतपूरी ते घोटी यादरम्यानच्या महामार्गालगत आहे. तेथे राज्य परिवहन महामंडळामार्फत विनंती थांबा मंजूर करण्यात आला असून, या थांब्यावरुन महाविद्यालयीन वेळेत जाणाऱ्या व येणाऱ्या बसफेऱ्या थांबवून विद्यार्थ्यांची चढ-उतार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य परिवहन विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३२) ११०५५० (०१-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन विभागिय कार्यशाळा वेगवेगळया समस्यांच्या विळख्यात सापडले असून कार्यशाळेत स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चाललेला असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या वर्षापासून स्वच्छतागृहांची दूरावस्था झाल्यामुळे येथील कर्मचा-यांनी मागील कांही महिन्यापासून स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, राज्य परिवहन विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागीय कार्यशाळेतील स्वच्छतागृहामध्ये तुंबलेल्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. सदर दुरुस्ती करुन स्वच्छतागृह कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच, कार्यशाळेत महानगरपालिकेतर्फे सतत पाणी पुरवठा असून, पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात एस.टी. महामंडळाचे विभाग नियंत्रक पद रिक्त असलेबाबत

**(३३) १११७४७ (०१-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात एस.टी. महामंडळाचे विभाग नियंत्रक हे पद गेल्या चार महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पद रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रिक्त पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) सेवानिवृत्तीमुळे दि.३१.१०.२०१७ पासून सदर पद रिक्त झाले होते. त्यामुळे दि.०१.११.२०१७ ते ०६.१२.२०१७ या कालावधीत यंत्र अभियंता (चा) यांचेकडे व दि.०७.१२.२०१७ ते दि.०१.०४.२०१८ या कालावधीत विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सांगली विभाग यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर सामान्य आस्थापना आदेश क्रमांक ११६ (सेमं)/२०१८ नुसार श्री.रो.भा.पलंगे यांची विभाग नियंत्रक पदावर नेमणूक करण्यात आली आहे. सदर पदावर ते दि.०२.०४.२०१८ पासून रुजू झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात कामासाठी अधिक शुल्क आकारल्याबाबत

**(३४) १११८१५ (०१-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये शासनाने नागरिक सेवा केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या सुविधानुसार वाहन चालक परवान्यासाठी अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे व शुल्क भरणे यासाठी २० रुपयांचे शुल्क शासनाने निश्चित करुन दिले असतानाही प्रत्यक्षात मात्र उक्त कामासाठी संबंधित कर्मचा-यांकडून १०० रु. सर्रास शुल्क घेतले जात असल्याचे अलिकडेच निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) वाहनचालक परवान्यासंदर्भात विविध सेवा देण्यासाठी सारथी ही ऑनलाईन संगणक प्रणाली राज्यात सर्व परिवहन कार्यालयात लागू करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रणालीद्वारे अर्जदारास घरबसल्या अर्ज करता येतो. तसेच, जिल्ह्यामध्ये ८०० नागरी सेवा केंद्रातून वाहन चालक परवान्यासाठी अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे व इतर शुल्क भरणे इ. सुविधांकरिता प्रति अर्ज रु २०/- प्रमाणे सेवाशुल्क जमा करुन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शासनाने दि.२९.११.२०१७ पासून रु.२०/- ऐवजी रु.१००/- प्रती अर्ज सेवाशुल्क निश्चित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात रेणापूर-पिंपळफाटा खरोळा मार्गे बससेवा सुरु करण्याबाबत**

**(३५) ११२०५१ (०१-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील प्रवाशांच्या व विद्यार्थ्यांची प्रवासाची गैरसोय होत असल्याकारणाने रेणापूर -पिंपळफाटा खरोळा मार्गे आष्टामोड हि बससेवा सुरु करण्याबाबत व प्रवासाची होत असलेली गैरसोय दूर करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी विभाग नियंत्रक राज्य परिवहन विभाग लातूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) रेणापूर फाटा ते आष्टामोड या मार्गावर थेट बससेवा उपलब्ध नाही, परंतु रेणापूर फाटा ते खरोळा, लातूर ते आनंदवाडी मार्गे रेणापूर फाटा, खरोळा, आनंदवाडी मोड व लातूर आगाराची लातूर ते धवेली मार्गे आष्टामोड, आनंदवाडी मोड अशा बससेवा उपलब्ध आहेत.

सन २०१८ मध्ये उदगीर ते आंबाजोगाई मार्गे आष्टामोड, आनंदवाडी, खरोळा, रेणापूर फाटा ०७.०० व १४.१५ वाजता या नवीन फेऱ्या समाविष्ट करण्यात आल्या असून, दि.१९.०४.२०१८ पासून उदगीर ते आंबाजोगाई मार्गे आष्टामोड, आनंदवाडी मोड, खरोळा, रेणापूर फाटा अशी बससेवा सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल जि.रायगड) राज्य परिवहन आगाराचे बस पोर्टमध्ये रूपांतर करण्याबाबत**

**(३६) ११२२०३ (०१-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल जि.रायगड) राज्य परिवहन आगाराचे बस पोर्टमध्ये रूपांतर करण्याची मा.परिवहन मंत्री, यांनी घोषणा करून गेले अनेक महिने होवून सुद्धा पनवेल परिवहन बस आगाराची अद्याप पर्यंत बस पोर्टच्या कामास सुरूवातही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास मोठ्या प्रमाणात महसुली फायदा देणा-या पनवेल बस आगारातून दररोज साडेसात ते आठ हजार बस ये-जा करीत असून सद्यस्थितीत बस आगाराची अतिशय दयनिय अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस स्थानकाचे रूपांतर बस पोर्टमध्ये करण्यासाठी वारंवार अंदाजपत्रके काढून सुद्धा प्रतिसाद न मिळाल्यामुळे अद्यापपर्यंत बस पोर्टच्या कामाला सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पनवेल बस आगाराच्या बस पोर्टच्या रूपांतरासाठी नव्याने काढलेल्या अंदाजपत्रक उघडण्याच्या तारखा उलटून गेल्या असतानासुद्धा संबंधीत विभागाकडून कोणतीच कारवाई न झाल्यामुळे बस पोर्टच्या कामात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल बस आगाराचे रूपांतर बस पोर्टमध्ये तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) पनवेल येथील बस पोर्टच्या कामासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे मे.एडूस पार्क इंटरनेशनल प्रा.लि., मे.डॉरिक इन्फ्रा प्रा.लि. व मे.प्रतिभा इंडस्ट्रिज प्रा.लि. (संयुक्त) विकासकाची निवड करण्यात आली असून त्यांना पनवेल येथील बस पोर्टच्या कामासाठी महामंडळाशी विकास करार करण्याबाबत दि.२८.०३.२०१८ रोजी स्विकारपत्र देण्यात आलेले आहे.

तसेच, पनवेल बसस्थानकाची इमारत अत्यंत जुनी व जीर्ण झाली असल्याने ती तोडण्यात आली आहे व प्रवाशांची गैरसोय होवू नये यासाठी पर्यायी फलाटांची व्यवस्था करुन वाहतूक सुरळीतपणे सुरु ठेवली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तारदाळ ते हातकणंगले (जि.कोल्हापूर) मार्गावरील बंद असलेली एस.टी.वहातूक त्वरित सुरु करण्याबाबत

**(३७) ११२२७८ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारदाळ ते हातकणंगले (जि.कोल्हापूर) मार्गावरील एसटी वाहतूक गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तारदाळ येथील सन्मती हायस्कूल जवळ रेल्वे प्रशासनाने रेल्वे फाटकावर भुयारी मार्गाचे काम चुकीच्या पद्धतीने व अरुंद केले असल्यामुळे एसटी वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे प्रशासन यांनी संयुक्तरित्या एस टी वाहतुकीचे चाचणी घेतली असता अडथळा नसल्याचे स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती कोल्हापूर जिल्ह्यातील तारदाळ ते हातकणंगले मार्गावरील एसटी वाहतूक गेल्या दीड वर्षापासून बंद असेलेली एस.टी.वहातूक त्वरित चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन व राज्य परिवहन महामंडळ यांची संयुक्तरित्या एस.टी.वाहतूकीची चाचणी झालेली नाही. मात्र जानेवारी, २०१८ मध्ये आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, इचलकरंजी व वाहतूक निरिक्षक (प्रशिक्षण) यांनी सदर रस्त्याचा राज्य परिवहन प्रशिक्षण बसद्वारे सर्व्हे केला असता, पुलाखालील रस्त्याच्या दक्षिण बाजुला वळणावर एस.टी.ला वळण घेता येत नसल्याने रस्त्याची रुंदी वाढविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. दि.२६.०२.२०१८ रोजी पुन:श्च सर्व्हे केला असता, उपरोक्त त्रुटी अद्यापही दूर केल्या नसल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत

**(३८) ११२४१८ (०१-०४-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.परिवहन मंत्री यांच्याकडे लेखी मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) दि.०६.०१.२०१८ ते दि.२६.०१.२०१८ पर्यंत व दि.१२.०२.२०१८ ते दि.०९.०३.२०१८ या एकूण ३५ दिवसांच्या कालावधीत सोलापूर ते खुनेश्वर ही फेरी चालविण्यात आली होती. सदर फेरीचे भारमान सरासरी १६% इतके अत्यल्प आलेले होते. त्यामुळे सदरची फेरी दि.१०.०३.२०१८ पासून बंद करण्यात आलेली आहे. सध्या मोहोळ ते खुनेश्वर मुक्कामी फेरी उपलब्ध असून, मोहोळ ते सोलापूर ५ ते १० मिनिटांच्या अंतराने बसेस उपलब्ध आहेत. त्यामुळे सोलापूर ते खुनेश्वर मार्गावरील प्रवाशांची गैरसोय झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेनगाव, ओढा, हिंगोली येथील आगारामध्ये सोई-सुविधा पुरविण्याबाबत**

**(३९) ११२५३० (०१-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात सर्व एस.टी.च्या आगारात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरलेले असल्यामुळे जिल्ह्यातील प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेनगाव, ओढा, हिंगोली येथील आगारामध्ये पुरेशा सोई-सुविधा नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सेनगाव, ओढा, हिंगोली येथील आगारामध्ये सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाद्वारे सफाईगार कर्मचाऱ्यांकडून सेनगांव, औंढा, हिंगोली येथील येथील आगारांच्या स्वच्छतेची कामे नियमित करुन घेतली जातात. दि.०१.१२.२०१७ पासून स्वच्छतेच्या कामकाजासाठी मे.ब्रीक्स इंडिया प्रा.लि. या कंपनीशी साफसफाईचा करार केला असून, त्यांचेकडून राज्य परिवहन महामंडळाची सर्व आगारे व बसस्थानकांची नियमित साफसफाई करण्यात येते.

राज्य परिवहन महामंडळामार्फत सेनगांव, औंढा व हिंगोली आगारात प्रवाशांना पुरेशा सोयी-सुविधा देण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या आकृतिबंधातील पदांबाबत**

**(४०) ११२५५४ (०१-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या सात वर्षापूर्वीच्या आकृतिबंधात साडेपाच हजार पदे रद्द करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या आकृतिबंधामध्ये आणखी सहा हजार ४५५ पदे रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या संख्येने पदे रद्द करण्याची कारणे काय आहेत व या प्रस्तावावर महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाला अमान्य असून प्रस्तावास मंजूरी दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती योग्य ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३०-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दिनांक २९ मे, १९९८ च्या शासन निर्णयान्वये कृषि, फलोत्पादन, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन या तिन्ही यंत्रणांचे एकत्रिकरण करुन एक खिडकी योजनेनुसार कृषि विभागाच्या एकूण ३३०५१ पदांची फेररचना करण्यात आली.

त्यानंतर दि.२७.३.२००१ च्या शासन निर्णयानुसार ५०२५ पदे समर्पित करण्यात आली.

दिनांक २२.५.२००९ च्या शासन निर्णयानुसार ५६१ पदे समर्पित करुन २७४६१ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला.

(२) अंशत: खरे आहे.

वित्त विभागाने दि.२९.५.२०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनान्वये सुधारीत आकृतिबंध सादर करण्याचे निदेश दिलेले आहेत. तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि.३१.५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मृद व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्यात आलेली असून सदर कार्यालयासाठी एकूण ९९६७ पदे वर्ग करणे अपेक्षित आहे.

सदर दोन्ही बाबी विचारात घेऊन सुधारीत आकृतिबंध वित्त विभागास सादर करण्यात आलेला असून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. नेमकी किती पदे जलसंधारण विभागाकडे हस्तांतरीत करावयाची आहेत, त्यावर अंतिम निर्णय झाला नाही.

(३) वित्त विभागाच्या दि.२९.६.२०१७ च्या शासन निर्णयानुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि.३१.५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार कृषि विभागातील काही पदे जलसंधारण विभागास कायमस्वरुपी वर्ग करावयाची असल्याने कृषि विभागातील पदे रिक्त होण्याची शक्यता आहे.

जलसंधारण विभागास कायमस्वरुपी पदे देण्याबाबतचे कृषि विभागाचे अभिप्राय जलसंधारण विभागास कळविण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य कृषि सेवा महासंघ, पुणे व इतर संलग्न संघटनांना विश्वासात घेऊन चर्चा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य कृषि सेवा महासंघाने दि.२९.११.२०१६ च्या निवेदनाद्वारे मा.मंत्री (कृषि) यांना दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**रत्नागिरीतील नवीन बसस्थानकाचे बांधकाम तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(४१) ११२५८६ (०१-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीतील नवीन बसस्थानकाची उभारणी बीओटी ऐवजी स्वनिधीतून करण्याचा निर्णय एस टी महामंडळाने घेतल्यानंतरही बांधकामासाठी अद्यापी सुरुवात झालेली नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन महिन्यात दोन वेळा बांधकाम नगरपरिषदेच्या ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करुनही त्याला अदयापही मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती रत्नागिरीतील नवीन बसस्थानकाचे बांधकाम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी येथील नवीन बसस्थानकाचे बांधकाम बीओटी ऐवजी स्वनिधीतून करणेसाठी मक्तेदाराला दि.२३.०१.२०१८ रोजी कार्यादेश देणेत आला आहे. प्रवाशी जनतेची गैरसोय टाळणेचे दृष्टीने शहर बसस्थानक इमारतीमध्ये वाहतुकीबाबत पर्यायी व्यवस्था करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एस.टी. च्या अपघातामुळे मृत पावलेल्या वारसाना नोकरी मिळण्याबाबत**

**(४२) ११३५३० (०४-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौज अड्याळ (ता.पवनी, जि.भंडारा) येथील मृतक दिलीप तुळशीराम कासारे यांचा दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यादरम्यान अड्याळ येथील बस स्थानकावर एस. टी. बस ने अपघाती मृत्यू झाला असून त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व तीन मुले आहेत घरातील कमावता व्यक्ति मृत पावल्याने कुटुंबावर आलेले आर्थिक संकटामुळे दि. ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. परिवहन मंत्री, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाद्वारे मा. महाव्यवस्थापक (वाहतूक) रा. प. मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांना स्थानिक लोकप्रतीनिधीद्वारे मृत कुटुंबांच्या वारसाना नोकरी मिळावी यासाठी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती मृत कुटुंबांच्या वारसांना नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) नाही.

मृतक दिलीप तुळशीराम कासारे यांचे वारसांना नोकरी मिळावी म्हणून ग्रामपंचायत अडयाळ यांनी दि.१५.८.२०१७ रोजी विशेष ग्रामसभा घेवून ठराव पारीत केला असून, ठरावाची प्रत व निवेदन विभागीय कार्यालय भंडारा यांचेकडून वाहतूक खात्यास प्राप्त झाली आहे.
(२) व (३) राज्य परिवहन अपघातातील मयाताचे वारसांना राज्य परिवहन सेवेत समाविष्ट करणेबाबतची तरतूद नाही. तथापि, मयत दिलीप कासारे यांचे वारसांना रुपये १० लाख इतकी अपघात नुकसान भरपाई दि.२३.०९.२०१७ रोजी अदा करण्यात आली आहे. तसेच सदर अपघातास जबाबदार चालकाविरुध्द शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार प्रमादीय कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयातील पुसेसावळी बसस्थानकाच्या आवाराचे डांबरीकरण करण्यासोबत वीज दिवे सुरु करण्याबाबत

**(४३) ११३७४१ (०१-०४-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील पुसेसावळी बसस्थानकाच्या आवारात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गेल्या चार वर्षापासून डांबरीकरण न झाल्यामुळे खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे बसेस आगारात आल्यावर दगड उडून प्रवाशांना मार लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील खंबावरील दिवेही बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या बसस्थानकाच्या आवाराचे तातडीने डांबरीकरण करण्यासोबत येथील वीज दिवे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ठिंबक संच बसविलेल्या शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत

**(४४) ११४४८९ (०१-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना ठिंबक अनुदानासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने सन २०१७ व २०१८ करिता किती निधी मंजूर केला आहे,
(२) असल्यास ,त्यापैंकी किती शेतकऱ्यांना निधीचे वाटप करण्यांत आले आहे,
(३) असल्यास, अद्यापी वाटप न झालेले किती शेतकरी आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती मंजूर झालेला निधी शेतक-यांना त्वरित वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-०५-२०१८) :** (१) २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षात विविध स्त्रोतांमधून अनुक्रमे रु. ४८०.०४ कोटी व रु. ५५१.९३ कोटी एवढा निधी मंजूर केला होता.
(२) सन २०१६-१७ मधील १,६२,४८१ व सन २०१७-१८ मधील १,६९,११३ शेतक-यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) पुर्व संमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या सन २०१६-१७ या वर्षातील शेतक-यांचे अनुदान प्रलंबित नाही. सन २०१७-१८ या वर्षातील १९४०६५ शेतक-यांचे अनुदान प्रलंबित आहेत. सदर शेतक-यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटी महामंडळातील अनुकंपा तत्वावरील वारसांना सहाय्यता निधी देण्याबाबत**

**(४५) ११४६८० (०१-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी महामंडळातील अनुकंपा तत्वावरील प्रतिक्षा यादीत वर्षानुवर्षे रखडलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना १० लाख रुपयांपर्यंत सहाय्यता निधी देण्याचा पर्याय महामंडळाने दिला असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्वावरील वारसांना एकतर नोकरीतील दावा वा सहाय्यता निधी यापैकी एक पर्याय निवडण्याचा घेतलेला निर्णय वारसांना मान्य आहे काय,

(३) असल्यास, त्यानूसार सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती वारसांना याचा लाभ मिळालेला आहे व उर्वरित वारसांना कधीपर्यंत निधी देण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी अथवा १० लाख सहाय्यता निधी यापैकी एक पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता परिपत्रकीय सूचना प्रसारीत झाल्यानंतर महामंडळात सध्या अनुकंपा तत्वावरील मंजूर प्रकरणांच्या प्रतिक्षा यादीवर असलेल्या व मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांसह यापुढे नव्याने येणाऱ्या अनुकंपा तत्वावरील प्रकरणांना उपरोक्त धोरण लागू राहील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात एस. टी. महामंडळाच्या आगारातील बसगाड्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४६) ११४८०७ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस. टी. महामंडळाच्या १८०० बसगाड्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या सुट्या भागांअभावी रस्त्यांवर चालविण्यात येत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे आणि राज्यातील महामंडळाच्या सर्व आगारात बसगाड्यांच्या दुरुस्तीसाठी असणाऱ्या सुट्या भागांची कमतरता दूर करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील चिखलदरा येथे नादुरुस्त बसेस असल्याबाबत**

**(४७) ११४८५५ (०१-०४-२०१८). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील चिखलदरा या आदिवासी भागात एसटी महामंडळ मनमानीपणे नादुरुस्त बसेस पाठवित असून परिणामी बसेस घाटात बंद पडून प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, चिखलदरा क्षेत्रातील रस्त्यावरील प्रवासी निवाऱ्यांचीही दूरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) येथील जीर्ण झालेल्या बस स्थानकाचे नुतनीकरण करणेबाबत**

**(४८) ११५२४० (०१-०४-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) येथील बस स्थानक अत्यंत जीर्ण व पडक्या अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर बस स्थानकाचे नुतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) यावल येथील बसस्थानकाचे सर्वेक्षण करुन त्याचे नुतीकरण/पुनर्बांधणी करण्यासाठी आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी दि डिझायनर्स कलेक्टीव्ह, नाशिक यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतू त्यांचेकडून आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यास विलंब होत असल्याने नविन वास्तुविशारदाची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात वाहनांची तपासणीस स्वतंत्र रॉम्प (Ramp) उभारणीबाबत**

**(४९) ११५२७४ (०१-०४-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील प्रवासी वाहतूक व मालवाहतूक वाहनधारकांना वाहन पासिंगसाठी ठेवण्यात आलेल्या जाचक अटी रद्द करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, वाहनांचे पासिंग करतांना वाहनांची तपासणी स्वतंत्र रॉम्प (Ramp) वर करावी असे न्यायालयाचे निर्देश असतांना रॉम्प (Ramp) ची उभारणी न करताच उत्तर रत्नागिरीतील वाहनांचे पासिंग बंद केले असल्याने वाहनधारकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्तर रत्नागिरी साठी स्वतंत्र रॉम्प (Ramp) उभारणीचे आदेश मा. परिवहन मंत्री यांनी दिले आहेत , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रॉम्प (Ramp) साठी चिपळूण तालुक्यातील पिंपळी बुद्रुक येथे जागा निश्चित झालेली असूनही सदर कामासाठी विलंब होत आहे , हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर रॉम्प (Ramp)ची उभारणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. २८/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये ब्रेक टेस्ट ट्रॅकची उभारणी करणे बंधनकारक केले आहे. मा. उच्च न्यायालयाने या मुदतीत प्रकरणपरत्वे वेळोवेळी वाढ केली आहे. सबब अद्याप वाहनांचे पासिंग बंद केलेले नाही.
(३), (४) आणि (५) हे खरे नाही. मौजे पिंपळी बु. ता.चिपळुण येथे २५० मी. लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीसाठीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील जिल्हा दुध उत्पादक संघामार्फत शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या दुध विक्रीची रक्कम शेतकऱ्यांना त्वरित देण्याबाबत**

**(५०) ११५६९९ (०१-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील जिल्हा दुध उत्पादक संघामार्फत शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या दुध विक्रीची रक्कम शेतकऱ्यांना अद्‌याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना त्यांच्या दुध विक्रीची रक्कम लकरात लवकर मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३१-०५-२०१८) :** (१) राज्यातील नागपूर विभागातील भंडारा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्या.,भंडारा या संघाव्यतिरिक्त इतर संघांनी दि.३१.०३.२०१८ पर्यंतची देयके शेतक-यांना अदा केली आहेत.

(२) होय, भंडारा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्या.,भंडारा या संघाने दूध उत्पादक शेतक-यांचे दि. २१.०३.२०१८ ते ३१.०३.२०१८ या कालावधीची दूध देयके देण्याचे शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) भंडारा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्या,भंडारा,र.नं.१०१ यांचेकडील दिनांक २१/०३/२०१८ ते ३१/०३/२०१८ या कालावधीतील शेतक-यांचे प्रलंबित दूध देयक संपूर्ण अदा करण्यात आले असून सध्या संघाचे दुधाचे चुकारे नियमित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.